# निधर्मी

म. ग. शाहाणे.




म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४२०

REFBK-0022955

काव्य
२४२०
२२९५५
संदर्भ शाखा
२६।८।८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 4 FEB 1988

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

# निष्प्रभैं

ग. म. सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
दा. क्र. २२०५९
२४२०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0022955
REFBK-0022955

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान साहाय्याने ॥

निधर्मी
आंतर भारती प्रकाशन
औराद शहाजानी

Nidharmee
(Marathi)
F. M. Shahajinde

सर्वहक्क :
सौ. आसू शहाजिंदे
औराद-शहाजानी ४१३५२२
जि. उस्मानाबाद

पहिली आवृत्ती
१९७९/१९८०

वितरण
सौ. आसू शहाजिंदे
औरादशहाजानी ४१३५२२
जि. उस्मानाबाद

।। मुखपृष्ठ ।।
न. मा. परसावळे

।। रेखाटने ।।
वसंत आबाजी डहाके
रवींद्र ठाकूर

।। अक्षरे ।।
प्रकाश कामतीकर
फ. म. शहाजिंदे

।। मुद्रक ।।
आन्तर भारती मुद्रणालय
औराद शहाजानी ४१३५२२
जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

किंमत : ११ रुपये


माझ्या छातीवर
जगन्नाथ रथोत्सवाची



संत कान्होपात्रा नि पै. मोतीबेगम यांच्या व्यक्तकृतेता -

प्रस्तावना

नरहर कुरूंदकर

माझे मित्र प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या " निधर्मी " या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहिताना माझे मन एका विशेष उत्साहाने भरुन आलेले आहे. या विशेष उत्साहाचे कारण वाड्.मयीन नसून अवाङ्मयीन आहे. मी स्वत: असे मानतो की अवाड्.मयीन बाबी सुद्धा जर वाड्.मयावर प्रभाव टाकू लागल्या तर वाड्.मयाच्या अभ्यासात महत्वाच्या ठरतात. फकीर महेबूब शहाजिंदे हा एक मुसलमान कवी आहे. सामान्यपणें मराठीत मुस्लिम लेखकांनी फारसे काही लिहिलेले आढळत नाही. इतर भारतीय भाषांची परिस्थिती नेमकी काय आहे? या विषयी अंदाजाने काही तरी बोलणे बरोबर ठरणार नाही. पण मराठी पुरते मुसलमान लेखकांचे चित्र मोठे चमत्कारीक दिसते, याची नोंद केलीच पाहिजे. माझे मित्र डॉ. रा. चिं. ढेरे यांनी ' मुसलमान मराठी संतकवी ' या नावाचे एक पुस्तकच लिहिलेले आहे; या पुस्तकात प्राचीन मराठी वाड्.मयातील अनेक मुसलमान मराठी कवींचा परिचय करुन देण्यात आलेला आहे. डॉ. ढेरे यांनी परिचय करुन दिलेले सर्व मुसलमान कवी मुस्लिम समाजात जन्माला आले, इतक्या अर्थानेच मुसलमान आहेत. त्यांची भाषा, त्यांचे विचार आणि वाड्.मयातून व्यक्त होणारी त्यांची संस्कृती या साऱ्यांच्यासह हे सारे लिखाण अगदी हिन्दू आहे. शेख महंमद सारखा कवी, 'योगसंग्राम' सारखा ग्रंथ लिहितो या ग्रंथात त्याचे नांव शेख महमद सोडले तर तो मुसलमान असल्याचा कोणताही पत्ता लागत नाही. कांही मुसलमान लेखक या प्रकारचे आहेत. आधुनिक काळातले या गटातील चांगले उदाहरण द्यायचे तर शाहीर अमर शेखांचे सांगता येईल.

मुस्लिम लेखकांचा अजून अेक दुसरा गट आहे. या मंडळींचा महाराष्ट्राशी संबंध फक्त ते मराठीतून लिहितात इतकाच असतो. आपण भारतात आहोत याचेही भान त्यांना नसते. कोणत्याही ऐतिहासिक अगर चिकित्सक दृष्टीचा संबंध येवू न देता त्यांचे श्रद्धाळू मन, इस्लाम धर्म, महंमद पैगंबर आणि सातव्या शतकातील अरबस्तान इथेच घोटाळत असते. या गटातील मंडळी मोठ्या श्रद्धेने महंमद पैगंबराचे चरित्र आणि इस्लाम या विषयी लिहित असतात. या दोन गटांच्या बाहेर असणाऱ्या मुस्लिम लेखकांची संख्या बोटावर मोजण्या इतकी थोडी आहे. मराठीपुरता विचार करायचा तर हमिद दलवाई हे अेक ठळक नाव आहे. हा जो मुस्लिम समाजातील लेखकांचा अतिशय छोटा गट, या गटात माझे मित्र शहाजिंदे एक विचारात घेण्याजोगे कवी म्हणून प्रवेश करीत आहेत; ही माझ्या मते स्वागतार्ह घटना आहे.

शहाजिंदे हा कवी मुसलमान आहे याला वाड्.मयाच्या दृष्टिने काहीच महत्व नाही, हे मी जाणतो. वाड्.मयाच्या क्षेत्रात तुम्ही कोण्या जाती धर्माचे आहात हा प्रश्न फक्त अेका कारणाने महत्वाचा ठरत असतो ते कारण म्हणजे ह्या घटनेंमुळे वाड्.मयात अभिव्यक्त

झालेल्या अनुभवांना काही नवे परिमाण मिळालेले आहे काय? मला स्वतःला असे वाटते की ज्या प्रकारचा अेकलेपणा शहाजिंदे यांच्या कवितेत आहे त्या अेकलेपणाचे एक कारण तो मुसलमान आहे हे आहे. मुस्लिम समाज एक चमत्कारिक मन घेऊन जीवन जगत असतो. आपल्याच मनाने निर्माण केलेल्या भ्रामक इतिहासात त्याचे मन दडलेले असते. त्याचा भारताच्या इतिहासाशी फक्त मुस्लिम राजांच्या इतिहासापुरता संबंध असतो. भारतीय समाजात मिसळण्यापेक्षा आपले निराळेपण टिकवून ठेवण्याकडे त्याचा ओढा असतो. आपल्याच धर्म परंपरेने निर्माण केलेल्या या कोंडीतून ज्यांच्या मनाची सुटका झालेली आहे त्याची परिस्थिती तर याहून चमत्कारिक असते. शहाजिंदे सारखा कवी आपण सगळयांनाच परके आणि तिऱ्हाईत वाटतो. आपण अनुबंध जोडण्यास तयार आहोत पण भोवतालचा समाज ते अनुबंध स्वीकारण्यास मात्र तयार नाही. या चमत्कारिक बाधेमुळे उद्विग्न आणि एकटा पडलेला असतो. या विशिष्ट अेकटेपणामुळे निर्माण झालेल्या उद्विग्नतेचीं भावोत्कट चित्रे या संग्रहात जाजोजाग विखुरलेली आढळतात.

शहाजिंदे मुसलमान असल्यामुळे तो सगळचा बिगर मुसलमानांना परका वाटणार हे अगदी उघड आहे. तो भारतीय म्हणून हिन्दुच्या मध्ये मिसळू शकतो, धर्मातीत म्हणून हिन्दुच्यामध्ये मिसळू शकतो. पण तो जरी मिसळण्यास तयार असला तरी हिन्दू समाज त्याला आपल्यात फारसा मिसळू देणार नाही. हिन्दुना " सेक्युलर हिन्दू विषयी " जितका विश्वास वाटतो तसा मुसलमानाच्या विषयी वाटणे कठीण जाईल.

धर्माची कोंडी फोडून बाहेर आलेल्या मुसलमानाला जर तीव्रपणे कोठली गोष्ट जाणवत असेल तर ती ही की तो आपल्या समाजापासून तुटलेला आहे. आणि उरलेल्या समाजाशी मात्र जुटलेला नाही. आपण सगळीकडूनच तोडले जाऊन अेकाको पडलेलो आहोत याची उत्कट व्यथा अशा मंडळीना असते. शहाजिंदे यांचे दुःख तर याहीपेक्षा थोडेसे निराळे आहे. भारतात नानाविध आश्चर्य आहेत यापैकी अेक आश्चर्य म्हणजे इतिहासपरंपरेच्या स्मृतीनी निर्माण केलेल्या पोटजाती हे आहे.

शहाजिंदे कान्होपात्रेच्या कुळातील मुसलमान आहेत. आपण मुसलमान आहोत हे ही त्याला विसरता येणार नाही वारकरी संप्रदायातील प्रसिद्ध संत कान्होपात्रा हिच्या कुळातील आपण आहोत हे ही त्याला विसरता येणार नाही. वारकऱ्यांशी असणारा आपला संबध, हिन्दू चालीरितींशी असणारा आपला संबध त्याला टळणारा नाही नव्या विचारांचे संस्कार जरी शहाजिंदेवर झालेले नसते तरीं मुस्लिम समाजातील अेक उपेक्षित दलितप्राय पोट-जातीचा माणूस म्हणून त्याचे अस्तित्व उरले असते. मुस्लिम असून मुस्लिम समाजाला परका, मुस्लिम असल्यामुळे हिन्दु समाजाला परका या दोन घटनांच्यामुळे भारतीय असून भारतीय म्हणून जगण्याची जिद्द असून सुद्धा भारतीयांना परका, अशी इच्छा नसताना लादलेल्या परकेपणाचे ओझे मिरविण्याचा परंपरा प्राप्त सक्ती झालेला हा एक कवी आहे.

। निधर्मी ।

शहाजिदेच्या रुपाने मराठी वाड्.मयात दलित प्राय पण संवेदनाक्षम मन असलेल्या अेका मुस्लिम कवीचे अनुभव शद्वबद्ध होत आहेत. वाड्.मयाच्या समृद्धीच्या दृष्टीने मला ही गोष्ट स्वागताहर्य वाटते.

शहाजिदेचे स्वत:चे मन परंपरावादी नाही पण ज्या जगात त्याला वावरायचे आहे त्या जगातील माणसांची मने परंपरावादी आहेत. भोवताली पसरलेल्या या सर्व परंपरा वादाची विषण्ण करणारी नोंद घेणे या कवीला भाग आहे.

अेका संध्याकाळी घराच्या उंबरठचावर आई बसलेली आहे ही संध्याकाळ आणि हा उंबरठा या दोहोंनाही या कवितेत अनेक संदर्भ प्राप्त होतात. ही आई उंबरठचावरच आहे. ही मुसलमान असून मुसलमान नाही आणि तसे म्हटले तर मुसलमान आहेही.

ज्या परंपरांच्या गोष्टी ती सांगत आहे त्यांची आणि स्वत:च्याही जीवनाची संध्याकाळ या आई भोवती आहे. या आईला असे वाटते की तिच्या प्रिय मृताचा "अकरावा दिवस" विधीवत साजरा झाला पाहिजे. दहावा अकरावा दिवस उत्तरक्रियेत महत्वाचा ठरतो हिन्दू परंपरेत. ही स्त्री कान्होपात्रेच्या कुळातील आहे ती अकरावा दिवस साजरा करण्याची कल्पना विसरु शकत नाही आणि उरलेल्यांशी सोयरसंबंध ठेवणेही तिला आवडणार नाही. संध्याकाळ आणि उंबरठा या दोहोंच्या संपर्कात असणारी आई अभिमानाने स्मरण ठेवित आहे अेका जुन्या स्मृतीचे. कान्होपात्रा ही शेवटी गणिका होती. आपण गणिका कुळातील आहोत हा काहीं मोठा अभिमानाचा भाग नाही पण ती गणिका संत होती हा अभिमानाचा भाग आहे. आयुष्याची साठ वर्षे संपली तरी अंधश्रद्धा शाबूत ठेवणारी आई आणि मी नक्की कोण याचे उत्तर न सापडल्यामुळे, ते शुष्क हाडूक चघळित आयुष्याची सव्वीसपाने कोरी झालेला हा कवी. या दोन बाबी आणि त्यातला विसंवाद शहाजिदे डोळचासमोर ठेवतो कारण या सर्वांगिण विसंवादातच त्याच्या व्यथेच्या उगम आहे.

रमजान हा मुसलमानांचा पवित्र सण. हचा रमजानचा शेवट 'खुदबा' या सणावर होतो लहाणपणी या कवीनेही श्रद्धेने रमजानचे उपवास केलेले असतात. आता ती श्रद्धा संपलेली आहे. आता रमजानचे रोजे प्रेमभंगानंतर प्रेयसी आठवावी तसे आठवतात. पण श्रद्धा जरी नसली तरी रुढी म्हणून खुदबा करावाच लागतो. नावडती कविता नाईलाजाने शिकवावी लागते त्याप्रमाणे नाईलाज म्हणून का होईना पण विधी पार पाडावेच लागतात. मुसलमान कितीही सद्गुणी असला तरी हिन्दूचा त्यावर विश्वास नसतो. हिन्दुनी कितीही संरक्षण दिले तरी मुसलमानांना असुरक्षितच वाटते. हे पाहता पाहता शहाजिदे इतरांना आपल्या विषयी केलेल्या नोंदी लक्षात घेतो. कारण या आपल्या विषयी इतरांनी केलेल्या नोंदी आपल्या आत्मचरित्राचा भाग आहेत असे त्याला वाटते कारण जसा मी, मला तसाच तो मी आहे असा या कवीचा आग्रह नाही. जसा इतरांना मी दिसतो तसाही मी

आहे. असेच त्यालाही वाटते. स्वत:विषयी परस्पर विरोधी अभिप्राय हा कवी नोंदवित जातो. शहाजिंदेची तटस्थता हीच अेक अभ्यास विषय व्हावा अशी गुंतागुंतीची बाब आहे. भोवतालच्या समाजातील सर्व अंधश्रद्धा तो तटस्थपणे टिपीत राहातो. स्वत:च्या जीवना विषयी तो तितक्याच तटस्थपणे प्रतिक्रिया नोंदवितो. इतरांच्या आपल्या विषयीच्या प्रतिक्रियासुद्धा त्याने तटस्थपणे नोंदविलेल्या असतात आणि हा सगळा तटस्थपणा त्याच्या कवितेत सर्व बाजूनी जरी आला तरी त्यामुळे या कवितेतील उत्कट व्यथा आणि उद्वेग यांची धार मात्र बोथट होत नाही. अतिशय थंडपणे अस्वस्थ करणाऱ्या प्रतिक्रिया परस्पर विरोधाची लय साधीत तो शांतपणे नोंदवित राहतो. स्वत:विषयी इतरांच्या ज्या प्रतिक्रिया त्याने नोंदविलेल्या आहेत त्यापैकी 'अहो त्या मुसलमानाशी कशाला दोस्ती करता' या कुणीतरी काढलेल्या उद्गाराची नोंद आहे. 'सगळे मुसलमान असेच रागीट आक्रमक आणि हट्टी' अशी अेक नोंद आहे. 'स्वत:च्याच विषयी इतरांनी केलेंले कटपीस' असे वर्णनही एक नोंद आहे. या सगळ्या नोंदी जरी कवीच्या मनात टिपलेल्या असल्या तरी तो कोणत्याही जातीधर्माचा शत्रू नाही, द्वेष्टा झालेला नाही. तो मुस्लिम परंपरा वादाचा विरोधक आहे पण मुस्लिम समाजाचा शत्रू नाही किंवा मुस्लिम संस्कृतीचाही द्वेष्टा नाही. हिन्दू परंपरावादाचा तो विरोधक आहे पण हिन्दू समाजाचा अगर धर्माचा तो द्वेष्टा नाही. कधी कधी तर मला असे वाटते की माणसे अंध कर्मठपणा मनात ठेऊनच कशाचे तरी द्वेष्टे होतात. कर्मठपणाच्या बंधनातून ज्यांचे मन मोकळे झालेले आहे ती माणसे द्वेष्टी होऊ शकत नाहीत. त्यांना अेकाच वेळी सर्व "हास्यास्पद" सहानभुतीने समजून घ्यावे लागते. आणि सर्व सहानुभूती 'हास्यास्पदांना' सुधारुन घेण्यासाठी वापरावी लागते. हे सगळे दायित्व आपण सर्वत्र परके आहोत याचे भान ठेऊन स्वीकारावे लागते. शहाजिंदेच्या कवितेतील तटस्थपणा आणि उत्कटता या दोहोंचे अनुबंध या संदर्भात तपासावे लागतात.

शहाजिंदेच्या कवितेकडे जाण्यापूर्वी त्याच्या मनाची काहीशी ओळख करुन देण्याचा हा उद्योग सहेतुक आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रात आपण पृथगात्मतेला महत्व देतो. हे अनुभवाचे निराळेपण एकूण वाङ्मयाच्या समृद्धीत भर घालणारे असते. हे निराळेपण केवळ व्यक्ती च्या निराळेपणामुळे येत नाही. त्या व्यक्तीच्या मागे जे नानाविध संदर्भ उभे असतात त्या संदर्भाचाही या निराळेपणात वाटा असतो. दलित साहित्याचे निराळेपण हे केवळ लेखकां-च्यावर अवलंबून नाही. लेखका इतकाच सामाजिक संदर्भ महत्वाचा आहे. ललित वाङ्मयातील भावनाविश्व नुसत्या घटनांनी बनत नाही; घटनांच्या मागेपुढे भावनांचे कल्लोळ असतात. आणि भावनांच्या कल्लोळांच्या पार्श्वभूमीत सामाजिक सांस्कृतिक संदर्भ उभे असतात, त्यानी बनते.

शहाजिंदे यांची कविता ही जवळ जवळ गद्य असल्यासारखी आहे हें गद्य नुसते गद्य नाही. तर दैनंदिन भाषेत सतत वापरले जाणारे गद्य आहे. अशी गद्य वाक्येच अेकमेकांच्या

विरोधात उभी करुन शहाजिंदे आपल्या कवितेला आकार देत असतात. त्यामुळे या कवितेची वरवर पाहणी करणाऱ्यांना चटकन नीट ओळख पटणे कठीण आहे. या गद्य तुकड्यातच नकळत प्रतिमा येऊन जातात, सूचना असतात जुनी नवी प्रतिकेसुद्धा असतात. वर्तमान काळातील स्थळकाळाच्या नोंदी यांच्या शेजारी हिन्दू आणि मुसलमानांच्या धर्म, इतिहास आणि संस्कृतीचे संदर्भही असतात. यातील इस्लामी संस्कृतीचे संदर्भ नेहमीच मराठी वाचकांना चटकन कळतील असे नाही. मधेच 'इशाँची नमाज' असा उल्लेख असतो. 'खुदबा' हा शब्द मराठी आणि इस्लामी दोन्ही अर्थानी शेजारी शेजारी वापरलेला असतो. परमेश्वराच्या नावाने प्रार्थना हा तर खुदबाचा अर्थ आहेच पण बोलभाषेत खुदबा म्हणजे मारुन टाकणे –नष्ट करणे असाही अर्थ आहे. किंगलिअर नाटकातील अति प्रेमळपणाचा आव आणणाऱ्या हरामजाद्या पोरी, मुस्लिम औरंगजेब, महाभारतातील भीष्म, आणि आजच्या चित्रपट जगातील किशोरकुमार हे सगळे अेकाच कवितेत शेजारी शेजारी वावरत असतात. महाभारतातील शकुनी आणि कर्ण आजच्या दुकानदाराभोवताली असतात त्यानंतर लगेच मोहरमच्या दुःखाचा उल्लेख असतो. या कवितेतील गद्यप्रायता बोलभाषेतील वाक्ये ही अेक चकवा निर्माण करणारी सामुग्री आहे. ही सामुग्री घेऊन हा कवी काही तरी विलक्षण सांगण्याचा प्रयत्न करतो हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे. शब्दाच्या मध्ये असणारी सूचकता आणि शब्दाच्या मध्ये असणारी आघात करणारी ढोबळ परिणामकारकता या दोहोंचाही अेकाच वेळी वापर करण्याची या कवीची पद्धत आहे. म्हणून ही कविता वाचताना सतत हेलकावे बसत असतात. या हेलकाव्यानीच या कवितेत भावनिक ताण निर्माण केलेला आहे. शहाजिंदेची कविता फार अवघड आणि दुर्बोध नाही हे जितके खरे आहे तितकेच चटकन ती चिमटीत सापडणारी नाही हेही खरे आहे.

मध्येच हा कवी विचारणार, जेव्हा मातीची खेळणी मातीशीच बेईमान होतात, तेव्हा काय होते? तो आपणच उत्तर देतो की जेव्हा असे होते त्यावेळेला अनेक बाबीवर बंदी असूनही बंदी नसते आणि अशा वेळी प्रजासत्ताक झोपत झोपत चालत असते. झोपत झोपत चालणे रंगीबेरंगी जातीधर्म आणि धडधाकटांनी पांगळ्याची गाणी म्हणणे असे झोके देते देत हा कवी कविता लिहितो. धर्म द्रोहयांनी मातीद्रोह न करता वागायचे असे ठरविले म्हणजे मग निवडणुका घ्यायला हरकत नाही असे तो सांगतो. म्हणजे अेकावेळी तो 'माती' या शब्दाचे अनेक संदर्भ जागे करणार त्याचवेळी काही विरोधलयीचे प्रकार साधणार आणि हे करतानाच मिस्किलपणे अेखादे राजकीय भाष्य असे करणार की त्या भाष्यामुळे मन विषण्ण होऊन जावे. शहाजिंदे यांची कविता सतत वळणे, वाकणे घेत जाणारी असल्यामुळे तिचा अनलंकृत साधेपणा सुद्धा काळजीपूर्वक समजून घेण्याची गरज आहे. नाही तर त्यानीच म्हटल्याप्रमाणे अेखादेवेळी तुमच्या माझ्या आयुष्याची घसरगुंडी होते आणि अर्थ म्हणजेही एक घसरगुंडीच ठरते. नेमका पगार घेऊन आयुष्य चिवडल्या सारखे शब्दांचे अर्थ चिवडता,

येतील काय ? की शब्दाचे अर्थ चिवडित असताना चिमटीत फक्त घसरगुंडीच येईल ? हा श्न स्वत:ला सतत विचारीत ही कविता वाचावी लागते.

शहाजिदे यांना अेक गोष्ट जर सारखी जाणवत असेल तर ती ही आहे की आपल्या सामाजिक जीवनात, सामाजिक आणि राजकीय भूमिकांना फार वरवरचे अर्थ आहेत. कवीच्या भाषेत सांगायचे तर साम्यवादी खोकला येतो नंतर राष्ट्रीयत्वाचा घाम फुटतो. पुरोगामी हातरु-माल तोंडावरुन फिरवले जातात. शहाजिदेनी अतिशय मार्मिकपणे अशी नोंद केलेली आहे की धर्मनिरपेक्षतेचे कपडे ठाकठीक करुन खालमानेने मी त्या दिंडयांच्या मागून चालू लागलो. यातील चिमटा नीट समजून घेतला पाहिजे. तुम्ही धर्मनिरपेक्ष आहात हा मुद्दा फारसा महत्वाचा नाही. इतरांना तुम्ही धर्मनिरपेक्ष दिसला पाहिजेत, तसे इतरांना वाटले पाहिजे. इतरांना धर्मनिरपेक्ष वाटण्यासाठी कोणत्या भूमिका घ्याव्यात हेही इथे ठरलेले आहे. म्हणून त्या दिंडीत कपडे ठाकठीक करुन जावे लागते. स्वातंत्र्याच्या घोषणा करणारीही दिंडी असते. आणि तेवढयाच मूढपणे हया स्वातंत्र्याच्या दिंडीतही भजन चालू असते. सर्वांच्या जवळ अेक तुणतुणे लागतेच. कोणत्या तरी गर्दीत तुम्ही असलेच पाहिजे. गर्दीपेक्षा स्वतंत्र असण्या चा तुमचा हक्क स्वातंत्र्याच्या उपासकांनाही मान्य नसतो. या कवी जवळ कोणत्याच दिंडीचे तुणतुणे नाही. हे पहाताच सर्वजण त्याला टाळू लागतात. परंपरेने समृद्ध अशा सांस्कृतिक नगरीत, कोणीच बोलण्यास तयार नाही, असा तो कवी अेकटा राहतो. मंदिरातील गणप-तीला डोळयात डोळे रोखून विचारले ' अरे तू तरी मला ओळखतोस की नाही ? ' तर त्याने ओळख देण्याचे हेतूपुरस्पर टाळले. कोणच्याच कळपात आपल्याला जागा नाही म्हणून आपलाच कळप बरा यासाठी कवी स्वत:च्या कळपात परततो. धर्मनिरपेक्षतेचे कपडे खुंटीला टांगून तो आपला मशिदीकडे नमाज अदा करण्यासाठी जाऊ लागतो, तेव्हा त्याच्या लक्षात येते ते हे की आपल्या अंगावर कुठलेच कपडे नाहीत, त्यामुळे आपण अेकटेही आहोत आणि नागवेही आहोत.

या कवितेच्या शेवटी कवी सांगतो हस्तिनापूराच्या शिखरा शिखरावरुन भगीरथाच्या गंगेसारखी संपूर्ण क्रांती धो धो वाहत होती. अेक दिवस ही क्रांती आपल्याही पर्यन्त येणार ती जेंव्हा आपल्या पर्यन्त येईल तेव्हा अनेक डाग पडलेले धर्मनिरपेक्षतेचे कपडे आपण धुवून घेऊ. तो पर्यन्त अजगराच्या धडावर डोके टेकून कुंभकर्णासारखे झोपायला काय हरकत आहे. संपूर्णक्रांतीच्या घोषणा चालू असताना समाज मात्र शांतपणे कुंभकर्णासारखा झोपलेला आहे. आणि अशा अनेक क्रांत्या पचवून सुद्धा आपली सुस्ती न सोडणारा भार-ताचा राष्ट्रीय प्रवाह आहे. भगीरथ प्रयत्नाने अेकदाची गंगा पृथ्वीवर येणे आणि तरीही कुंभकर्ण झोपलेला असणे; हे दोन्हीही पुराणांचे संदर्भ असणारे कल्पनागुच्छ आहेत. यात स्वत: कवी अेकटाच उभा आहे. तो कधी आपले कपडे खुंटीवर टांगतो तर कधी कपडे

धुण्याची कल्पना करतो. धो धो वाहणारा प्रवाह आणि अजगराची सुस्ती, तुणतुणे वाजवित फिरणाऱ्या दिंड्या आणि कोणतेच तुणतुणे नसणारा कवी यांच्यातील विरोध लय सतत डोळ्यासमोर ठेवणे हा शहाजिंदेचा प्रयत्न असतो. यातच या कवितेचे सामर्थ्य आहे.

मधूनच शहाजिंदे यांना सुभाषितवजा वाक्ये वापरण्याचा छंद आहे. "वेड होता येत नाही म्हणून कशाच्या तरी वेडाचं सोंग घ्यावं लागतं". "सत्य खोटं वाटतं म्हणून भ्रमांना जवळ करावं" अशी वाक्ये ते लिहून जातात. मधून मधून उर्दू कवितांच्या आठवणी देतील अशी वाक्ये त्यांच्या कवितेत येऊन जातात. हिन्दू आणि मुस्लिम संस्कृती तर त्यांच्या कवितेत सगळी सरमिसळच झालेली आहे. कविच्याच भाषेत सांगायचे तर त्याच्या छाती वर जगन्नाथाचा रथोत्सव आणि मक्का मदिनेचा हाज ह्या दोहोंचीही अेकच गर्दी दाटलेली आहे, सर्वांनीच ज्याचा ताबा मागितला आणि या संघर्षातच जे मुळातच फाटले असे दोन जेरुसलेम आपणच आहोत असे कवीला वाटते.

शहाजिंदे फक्त सामाजिक जाणिवांच्या मध्येच गढलेले आहेत असे नाही. आपलें व्यक्तिगत जीवन निरनिराळ्या प्रेमानुभवांनी समृद्ध व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. पण प्रेमात बुडून जाण्याची कवीची इच्छा असली तरी तो स्वतःच हरवलेला आहे त्याला पुन्हा प्रेमात हरवणं कठीणच आहे. आपले मन हे पानझडीच्या काळात उगवलेले फूल आहे. कोमेजून जाण्याची प्रक्रिया चालू असतानाच उमलण्याची धडपड ते करीत राहते. या मनाच्या अंगणात अेकेक जण येते आणि खेळत खेळत निघून जाते. कवीचे म्हणणे असे आहे 'तुम्ही या खेळा, आणि जा' पण लवकर जा कारण मला झोपायचे असते, अेखाद्या प्राध्यापका बरोबर देखण्या मुली कॅन्टीनमध्ये चहा पिण्यास जातात. आणि आपल्याला मात्र ज्ञानेश्वर शिकवत बसावं लागत अशी कुरकुर करीत हा कवी म्हणतो उराशी पिवळी पानं जपवीत सावली हरवलेला वटवृक्ष अजूनही सावलीचा शोध करीत चाललेला आहे. अशा वैताग-लेल्या आपल्या मनाचे स्पष्टीकरण करताना तो म्हणतो की दलितांचा उद्वेग वजा केला तर त्यांच्या अंतर्मनाची स्पंदने माझी कविता सांगतच आहे.

तरीही त्याच्या जीवनाला प्रेमाचा सोनेरी स्पर्श झालेलाच आहे. जिंदगीची विहिर कोर-ताना, बांधण्याच्या नादात जिव्हाळ्याचे सर्व झरे बंद ठेवले तरी सांसारिक विहिरी पाझर तातच हे या कविने नाकारलेले नाही. शहाळी उरोजांच्या घनगर्द जंगलातून भटकत भटकत गाभुळलेल्या स्वप्नांचा काफिला, भिजत भिजत याही कवितेत येऊन जातो. विरागी रस्त्यावर उत्तररात्री बाभळींनी काय म्हणून आसवे ढाळावित? अशा प्रकारचे प्रश्न याही कविच्या जीवनात येतातच. पण या वैयक्तिक जीवनाला, त्यातील जाणिवांना शब्दरूप देण्यात कविला फारसे यश मिळत नाही. त्याचा मुख्य स्वर हरवलेपणातच राहतो.

मी सर्व धर्मांच्या सारखा बनावटी आहे, मला सर्वधर्म सारखेच आहेत, मी सर्वत्र परका आहे अशी हरवलेपणाची जाणिवच प्रमुख राहते. शहांजिदेच्या कवितेत या सामाजिक जाणिवेलाच मध्यवर्ती स्थान आहे.

या कवितांच्या बाबतीत अजून अेक गोष्ट नोंदवावी लागेल. शहांजिदे प्राय: सर्व बाबींचा तुच्छपणे उल्लेख करीत चालतात "पैशाची खैरात करवाशी वाटली तरी ऐपत नाही म्हणून स्वर्गाची आशाही बाळगता येत नाही" हा असाच अेक फटकारा. पापाने पैसा मिळवून पैशाने पुण्य विकत घेणाऱ्या मनोवृत्तावर. पुनर्जन्मावर विश्वास नसला तरी अेखादा पुनर्जन्म आल्यास मिळावा कारण मग दोन आत्मचरित्रे लिहिता येतील; असे तो म्हणून जातो. आपल्या बाटग्या कानांची खैबरखिंड सगळे काही अेकण्यासाठी मोकळी आहे अशी नोंद तो करतो, प्रश्नपत्रिका "मॉडेल गर्ल सारख्या" असतात त्या पावित्र्य टिकवितीलच याची खात्री नसते तुमच्या नकलांनी काजवे संघटित होतील पण सूर्य कधी हसणार नाही, असे तो सतत, तुच्छतेनें बोलत राहतो शहांजिदेच्या कवितेतील हा तुच्छतेने भरलेला फटकळपणा स्वतःचे दुःख पचविण्याचा प्रयत्न म्हणून पाहायला पाहिजे कारण हा कवी भाबडा आणि आशावादी नाही. तो वास्तवाचे भान बाळगणारा आणि सावध आहे. त्याचे मन कुढणारे व कडवट झालेले नाही. तो हताश आणि विफल झालेला नाही. सर्व उणीवा आणि सर्व पराभव उघडया डोळ्यांनी मोजून इथूनही आपण पुढे जाऊ शकू असे मानणारी चिवट श्रद्धा त्याच्या जवळ आहे. म्हणूनच त्याचा तुच्छपणा सतत मिस्कीलपणाचे रुप घेतो. आणि त्याची वेदना सतत समजूतदारपणाचे रूप घेत जाते.

साधी दिसणारी पण गुंतागुंतीची असणारी, गद्यप्राय वाटणारी पण उत्कट असणारी, दुःख भोगून अधिक समजूतदार झालेली पण आक्रस्ताळेपणा हेच भांडवल न समजणारी अशी कविता घेऊन साहित्याच्या दालनात शहांजिदे प्रवेश करीत आहेत. त्यांच्या कवितेने फार मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत. ही कविता सर्वअंगानी डवरुन येऊन वाढो अशी सदिच्छा व्यक्त करीत या कवीचे मी स्वागत करतो.

१

दरवर्षी घुबडी मुद्रा कलम केल्यायत
बोंबलण्याच्या खानदानी धुनींवर
तिजोरीतल्या शेलक्या शिव्या दिल्यायत
उदार होऊन. न चुकता. न मोजता.
बऱ्याच मावशांनी गवऱ्यात घातलंय
होळीसाठी गवऱ्या चोरतांना
पण आज पाठीवर कुणीतरी म्हटलं-
या लांड्यावर टाका रे टाका रंग !
पाठीमागून आलेल्या शिव्यांना गुंडाळत
होळीच पेटवायला गेलो तर तिथे,
होलीकाच दिसल्या प्रल्हाद भेटलाच नाही.
तेव्हा माझीच होळी पेटली नि राख
परतली किरायाच्या घरी !
आता खुशाल बसा स्मशानात माझ्या,
संशोधन करीत मी मुस्लिम असल्या नसल्याचं !

२

माझं काळीज मलाच जड झालंय
कुणाकुणाची तरी मनं सांभाळायची ?
मी वाळिवाचा पाऊस
कुठं फिरेन कुठं बसेन अन् काय बोलेन
याचा काही नेम नाही
कसं आवरायचं या आयुष्याला ?
कसं सावरायचं या आयुष्याला ?

३

रमजानचा खुद्बा आला की
'ला इलाहा इलल्लाहू' आठवतो
प्रेमभंगानंतर प्रेयसी आठवल्यासारखं.
बालपणीचे श्रद्धेने ओथंबलेले रोजे
गहाळ झालेले असतात,
औरंगजेबाच्या स्वप्नांसारखे.
असा भणंग फकीर नमाज पढतो
नावडत्या कविता पढवल्यासारखं
भीष्माच्या कोरड्या मनाला साक्षी ठेवून
वर्षातून किमान दोन खुद्ब्यांची नमाज पढतो
धार्मिकतेचा 'खुद्बा' करुन;
मंदिरातील घण्टा वाजवत वाजवत,
'किशोर'ची नक्कल करुन तोंड वाजवल्यासारखं
त्या त्या क्षणापुरता का होईना,
बेमालूम आव आणावा लागतो,
गरत्या धार्मिकतेचा !
किंगलियरच्या हरामजाद्या पोरींसारखा !
मग कोडं पडतं -
'दंगली का होत नाहीत?
धार्मिक - अधार्मिक म्हणून !
तरीही मी मुसलमान कसा ?
तू हिन्दू कसा ?
अन् आपण दोघेही -
स्पृश्य -अस्पृश्य कसे ?
कसे ?

४

मतं मागताना फोफावणारी तुमची मैत्री
दम्याची अचानक उबळ आल्यासारखी!
खदखदत फसफसणारे
तुमचे हे गोंडस आपलेपण
घेऊन काय चाटायचंय?
अश्रूतील जीवाचे जीवपण
तुम्ही काय भोगाल?
चालू द्या तुमचं
मी सगळेच दिवे विझवून टाकलेत
माहिताय मला
आता कुणीच येणार नाही
सूर्यच काय?
काजवेसुद्धा!

५

स्वप्नांच्या राखेतून रांगोळी काढावी,
रानात झोपून आकाशात पहावं.
वर्दळीने मिटण्यापूर्वी मनात कोरावी
सुखांना लाथाडून तिची आरास मांडावी
अल्ला ! अल्ला ! म्हणत कब्रीत जावं
आरासीसह !
कामचलाऊ दोस्ती करावी दुःखांशी
प्रश्नचिन्हांचा गळा दाबून उद्गारावं-
सावलीच्या अंधारा ! तुझा विस्तार होवो !
सत्य खोटं वाटतं म्हणून भ्रमांना जवळ करावं,
अन् शब्दांना गिळून टाकावं, हस्तरेखांकडे पहात !
कयामतीचे आसार असूनही कयामत येत नाही
त्याला झाडं-झुडपं तरी काय करणार ?

# ६ अलग तीन कविता

१

माझं आयुष्य :
मुत्रीतील गिचमीड : मुक्त : स्वैर : सांडलेल्या वाङ्मयासारखं
गोंदवून घेतलंय गोंडा सारखं
इम्पोर्टेड क्लॉथ-पिस म्हणून अंगांगावर
अन् गहाळ झाल्यासारखं शोधतोय सोलीव अंतरंग
सर्वांगीण जीवन-गटारात
अशा गटारांच्या संगमात शहराला बुडवून काढावं म्हणतोय
गंगेत बुडवल्यसारखं. मग-
उरलेल्या आयुष्याची अदलाबदल करायचीय
परमेश्वर पेढीवरनं कर्ज घेऊन
नास्तिक काय अन् आस्तिक काय ?
मीच माझी विटंबना करतोय गळचेपीसह !!

२

आयुष्यावर कलमा पढावा
सत्य असत्याच्या जन्मदात्रीला चेचून चेचून मारुन टाकावं
परीक्षिताला शिल्लकीत टाकून -
महाप्रस्थानाला निघावं
उजडेल तेथे उजडेल !

३

माझ्या छातीवर
जगन्नाथ रथोत्सवाची नि हाजची गर्दी दाटलीय
मी किंचित जेरुसलेम !

## ७ मोहरम

पिवळी पानं उराशी जपत
चाललाय वटवृक्ष
शोधात सावलीच्या
सावली हरवून
× × ×
ठिगळी सावरीत पानापानात दाटलाय
बल्बांचा घनघोर प्रकाश
नि झिंगलाय तो
बुळ्या काव्यात्म फिल्मी धुनांनी !
× × ×
शिट्ट्या मारत दुल्ला खेळणाऱ्यांच्या साक्षीत
विराजमान झाल्यायत
पवित्र पीरांच्या
अबार्शनलेल्या पत्रसी मूर्त्या
अफीमी कन्व्हेनशनची सावली उधळत
× × ×
या परवर दिगार !
कधी शिकवली रे तुझ्या बंद्यांना
मातम साजरा करण्याची
ही अफलातून तऱ्हा ?

८

माझी आई × × ×
अशाच एका संध्याकाळी
बसून घराच्या उंबरठ्यावर
होती म्हणाली, सहज एकदा -
" फकीर कुछ भी कर मगर
महेबुब सुभानीकी ग्यारवी कर "
आयुष्याच्या खुंटीला साठ गाठी मारुनही
आंबलेली अंधश्रद्धा शाबूत ठेवणारी
माझी आई × × × ×
अशाच एका संध्याकाळी
बसून घराच्या उंबरठ्यावर
होती म्हणाली असंही, सहज एकदा
"बेटा, उनसे अपनी सगाई नहीं होती.
अपना कूल कान्होपात्रा का कूल है!"
(तिऱ्हाईतांनी इकडे जरुर लक्ष द्यावं)
मी त्या त्या पांढऱ्या संध्याकाळी
'होयबा'चा नागवा होकारच दिला
पहिल्याचा होकार उंबरठ्या आत, दुसऱ्याचा उंबरठ्याबाहेर
फुकस्या जिवनाची सर्व्वास कोरी पानं फाडूनही, मी
'मी नक्की कोण ?'चं हाडूकच चघळतोय
उत्तरी माणूस-लाळेची शून्याकारी थेंबच गळताहेत
गळत गळतच राहाणाराहेत-
वांझोट्या ढगांसारखी !

९

विविधतेच्या गचोऱ्याला धरून
एकतेची मुंडी पिरगाळीत
हपापलेले
गोंधळलेले
चवताळलेले
पिसाळलेले असंख्य स्वप्नमय तांडे
आपापले अदृश्य तुणतुणे घेऊन
हिमालयाएवढ्या प्रामाणिकतेने
सर्व धामांच्या पावित्र्याने ओथंबून
हिंदुस्थानची मलई ती आहे आमची असे गर्जत गर्जत
माझ्याकडेच सरकत होते.
या हिंदी महासागराच्या लोंढ्याने
भांबावलो
चक्रावलो
दिपून गेलो
तेव्हा मला साम्यवादी खोकला आला
राष्ट्रीयत्वाचा घाम फुटला!
मग पुरोगामी हातरुमाल तोंडावर फिरवला
अन् धर्मनिरपेक्षतेचे कपडे ठाकठीक करुन खालमानेने
मी त्या दिंड्यांमागून चालू लागलो
तर त्या काफिल्यातील एकदोन तुणतुणे मागे रेंगाळले
थकले होते की जबरीने दाखल झाले होते कुणास ठाऊक!
बरे झाले सोबत मिळाली म्हणून
मी त्यांच्याबरोबर चालू लागलो
तसे त्यांचे चेहरे प्रश्नात्मक झाले
अहिंसक चेहरा हसरा ठेवत म्हटले-
'माझ्याकडे कुठलेच तुणतुणे नाही!

'तुम्ही कोण?'
'मी होय?'
मी या प्रतिनिधीशाहीतील एक नाचिज रहिवाशी आहे
आपण नंतर बोलू म्हणून ते तुणतुणे सटकले,
तेव्हा मी परंपरेने समृद्ध अशा सांस्कृतिक नगरीत प्रवेश केला होता!

गल्लीबोळातून हिंडताना एका चौकात
विद्युतदेवीच्या निराकारी प्रकाशात झगमगत
एक बसवेश्वराचं मंदिर होतं
त्याच्या दालनात मधोमध विराजमान झालेले होते
आरासीसह विभूत लावलेले वक्रतुंड महाकाय !
तेव्हा डोळ्यात डोळे रोवून विचारलं -
ओळखलस की नाही मला ?
शाळेत असताना तुझ्या आरतीला येत होतो !
दास गुरुजींचा काय गोड गळा होता !
तरीही त्याने ओळख देण्याचं हेतुपुरस्पर टाळलं
जाऊ द्या ! नाही तर नाही !
शेवटी देव तो देव !
तोपर्यन्त हातात कुणी तरी प्रसाद कोंबला होता
तो तोंडात टाकून खजीलपणा घालवत घालवत बाहेर पडलो

तर म. गांधी चौक आला
तिथे एक शाळा दिसली म्हणून आत गेलो
एक घुमट होतं
घुमटात आसन होतं
आसनावर तुकारामाचे रुप घेऊन
चिपळ्या वाजवत गणपती बप्पा भजनात दंग झालेले
डिस्टर्ब न करता फक्त राम राम ठोकून बाहेर पडलो

भटकत भटकत एका गल्लीत आलो
तर कुठल्यातरी मंडळाचा जानवं घातलेला गणपती बसला होता

शेजारी गुलालाची पोती लवंडली होती
अरे ! हा तर तोच गुलाल आहे
जो ध्वजारोहणानंतर आपल्याकडे सर्वांना लावतात.
प्रसाद वाटतानाचा गुलाल लावलेला आर्यसमाजी
प्राध्यापक मित्र आठवला
त्याने आंबेडकरांच्या पुतळ्याला हार घालायचं नाकारलं होतं

तेव्हा, मी आसपास निरखून पाहिलं होतं की,
कुठे राष्ट्रीय प्रवाह वगैरे दिसतो की काय म्हणून
अशा अनेक आठवणींची भेंडोळी उकलवून संपली
नि मग मी ठरवलं की आपापलं तुणतुणं घेऊन,
आपापल्या कळपात जायचं !
तेव्हा, मुल्ला ईशाँ नमाजची अजाँ देत होता.
घरी येऊन धर्मनिरपेक्षतेचे कपडे खुंटीला टांगले
ताहरत घेतली नि मशिदीच्या दिशेने चालू लागलो
आतापर्यन्त चारदोन सुऱ्यावर प्रार्थनेचं ढोंग केलं होतं
तसंच आताही करणार होतो तर,-
अर्ध्या वाटेतच लक्षात आलं की-
आपल्या अंगावर कसलेच कपडे नाहीत

अरे ! हे काय ?
आपण पूर्वी जिथे उभे होतो तिथेच आहोत !
एव्हाना, ईशाँची नमाज संपली असेल
झाडून सगळे जण टिंगलीची गरळ ओकत असतील
अनंत चतुर्दशीच्या शुभमुहूर्ती काही घडलं तर-
अशात मी जाऊन तरी काय करणार ?

सहज आकाशात पाहिलं तर
हस्तिनापूरच्या शिखराशिखरावरुन
मिनारामिनारावरुन
स्तंभास्तंभावरुन
संपूर्ण क्रांती धो धो करीत कोसळत होती
भगीरथाच्या गंगेसारखी !
वहात वहात इकडे आलीच तर
आताच खुंटीला टांगलेले धर्मनिरपेक्षतेचे कपडे
मस्तपैकी धुवून घेऊ
पण तोपर्यन्त,
अजगराच्या धडाला डोकं टेकवून
कुंभकर्णासारखं झोपायला काय हरकत आहे !

## १० जवळ जवळ दोन कविता

मरावसं वाटतंय,
म्हणून आत्मचारित्र लिहितोय.
मला माहित आहे -
माझी लाईफ - लाईन लॉंग आहे म्हणून सांगितलंय ज्योतिषाने !
पण माझा त्यावर विश्वास नाही.
अशा जगात आपल्यासारख्याने जगू नये असंच का वाटावं?
तसं वाटलं तरी त्याला इलाज नाही.
अशावेळी शब्दांची खैरात तरी करून घ्यावी !
पैशांची खैरात करावीशी वाटली तरी ऐपत नाही.
म्हणून जन्नतची आशा बाळगणंही गैर आहे.
पुनर्जन्मावर विश्वास नसला तरी पुनर्जन्म व्हावा !
म्हणजे परत एक आत्मचारित्र लिहायला आपण मोकळे !
दु:खाला दु:ख म्हणूच नये
पण 'त्या' शिवाय आपण आपल्याला सजवूही शकत नाही.
तर दु:खाला दु:ख म्हणावं अन् सिनेमाला जावं.
मग अशी काय जाम झोप येते की,
'काल काय झालं' याचा मस्त विसर पडतो
मग दिवसभर विस्मृतीला हुंगत राहावं
म्हणजे आपलं बरं असतं !

च्यायला, असं असलं तरी असं बरं नसतं
म्हणून निसर्ग कवीसारखं झाडांना, पाखरांना नद्यांना पहावं.
जमलं नाहीच तर पिकासोचा आव आणून चित्रं काढावीत.
नाचावं. गावं. दगडांना फोडावं. समाधी लावून बसावं.
वेडं होता येत नाही म्हणून कशाच्या तरी वेडाचं सोंग घ्यावं!
असं करण्यात थोडे बहुत तरी दिवस भुर्रकन् पळतील की!
तोपर्यन्त आपण बरंच काही भोगून निवतो
भोगलेलेच भोग शब्दात झाकत जावेत.
तात्पर्य, मरण्यापूर्वी प्रत्येकाने आत्मचारित्र लिहून ठेवावेत.
सोपंच असत की! मनात झाकलेलं शब्दांत झाकायचं!
झाकत झाकत मेलो तर पोरं तरी छापतील की!
यासाठी का होईना पुल्लिंगी वंश-वेल वाढवावी.
हेही जमलं नाही तर सगळंच दत्तक घ्यावं.
प्रतिमा-कल्पनांना इम्पोर्ट केल्यासारखं!
एकूण काय तर; आत्मचारित्र लिहावं.
कारण ते आपलंच असतं
माझ्या सारखंच!

## ११ अनुवाद : अन्तर्मनाचे

समजा, स्त्री ही अनंत कालाची माता आहे.
तर मग, आपण सगळेच इडिपस आहोत.
डोळ्यांच्या संदर्भात तरी.

× × ×

अशी मनःपूत बंधनं उपटली गेली प्राचीनतम संस्कृतीतून -,
तर भारतही बेपत्ता होण्याची संभावना संभवते.

× × ×

असं जाणवत राहिलं तरी -
डोळ्यांचे संभोग विझत नाहीत .
हात टेकले, डोळ्यांच्या हावरटपणाला.

× × ×

दलितांचा उद्वेग वजा जाता
अन्तर्मनाचा अनुवाद
पेश करतोय

× × ×

तथापी तुमच्याही आरशात असंच
तशी कालच माझ्या आरशाने चुगली केली-,
तुमचा आरसाच म्हणे असं म्हणाला-
'काही नाही रे ! सगळेच सारखे
हां, क्वालीटीत थोडा फार फरक असू शकतो
एरव्ही क्वालीटीने युनिटी होत नाही म्हणून सांग
बाकी, ए टू झेड् डोळे संभोगोत्सुक !'

आय एम् बॉबी
मुझसे दोस्ती करोगें ?
दोस्तीही क्यूँ ? ( डेटिंग भी !! )
( सेन्सार बोर्ड परवानगी देत असतं )
कोणाच्या बोलण्यात, कोणाच्या पाहाण्यात
कोणाच्या चालीत तर कोणाच्या कपडे करण्यात
तर कोणाच्या कशात
सेक्स जागृत करण्याची अनंत ताकद निर्माण झालीय.
( प्रत्येक नगरात एकेक सेन्सार बोर्ड असावं. रिव्हाइजड् )

× × ×

ये सब क्या हो रहा है ?

× × ×

तुमच्याही मनांनी मनाचं दान केलंय
कित्येकींचा पदर पसरलेला नसताना
अन् ओल्या जखमांसह मनांची दानं
घरंगळत आलीत तुमच्यापर्यन्त.
तुम्हीही जीवनं हमालासारखी वाहताहात
घरंगळत आलेल्या ओल्या जखमांना
आठवणींची मलमपट्टी लावत लावत
माझ्यासारखीच !

१२

हायब्रीडी सूर्यफुळांची सूर्याकडे पाठ
लिंगणात ठेवलेल्या अस्तित्वासारखी
तेव्हा,
निष्ठा गहाण ठेवून व्याजापोटी झिजणाऱ्या
कंबख्त अवसरवादी संकरीत मनांनो !
तुमच्या नकलांनी काजवे संघटित होतील.
पण सूर्य कधीच हसणार नाही !

## १३ इंप्रेशन्स : हैद्राबादच्या

१

एफ. एम. सी. क्लब
शांत मंद
धूसर धुंद
तू
तुझा अबोल सहवास
पीत पीत
चार तास
बघणं, बोलणं, पाहणं
तिऱ्हाईत !
तरीही माझ्या मनात
का गुरफटत चाललीयस
ओळख नसतानां !
मन असं शिंपडून जाऊ नये
मनाच्या अंगणात
कोणाच्याही !

२

तुझी याद
एक कविता
संवेदना खिळ्यांनी
मनाच्या मुद्रणालयात
मुद्रित !

३
यात मी विसरूनच गेलो होतो
की आज बकरीद आहे.
पान खाताना पान ठेल्यावर कळलं.
पंडितजींच्या घरी स्नान करुन ईद्‌गाह गाठला
जाताना नेहरू पार्क लागला,
कबुतरे व गुलाब नसलेला!
४
दुवा मागताना आज अचानक,
अश्रू गळले...... सणानिमित्त
सुदूर असलेल्या अपत्यांसाठी
अश्रू गाळणाऱ्या आई बापांना हसणाऱ्याच्या !
५
डोळ्यांनो !
किती येरझारे मारणार ?
स्तनालय ते डोळे डोळे ते स्तनालय,
स्त्रीचं 'मादी'पण
मी विसरूच शकत नाही.
डोळ्यांचं काय ?
६
ऋतूप्रमाणे उतू जाणारं
तुझं इरकली तारूण्य
कित्ती कित्ती साठवायचं,
डोळ्यांच्या या नाजूक चिमटीत ?
अर्थही वेटे,
संदर्भाप्रमाणे बदलणारे
उदाहरणार्थ : योनी वगैरे
माणसांचं काय ?

७

क्षण-ओळखी झालेल्या
असंख्य चेहऱ्यांनो !
सावळ्या रंगाला
एवढं काजळ ?

८

तुम्ही तुमचे चेहरे दाखवल्याबद्दल
धन्यवाद !
नोकरीची झकमारी करतानाही
दिवस बरे चाललेत

९

हिन्दू-संस्कृती म्हणजे काय ?
असं जर कोणी विचारलं,
तर मी सरळच सांगेन-
पोरींच्या भाळावरील
सदा बहार रेखीव कुंकू

१०

तुझ्या कुंकवाचं गडदपण
काळीजरंगी !
फडफडणारं,
फडफडविणारं !

११

आतापर्यन्त
तुझा लांबसडक शेपटा
लक्षातच आला नाही
खरं खरं सांगतो,
त्या रेशमी शेपट्याने गळफास लाव !
इतकी चांगली मौत
माझ्या नाशिबात नसेलच !

१२
एका मिनिटाला एक
मंदी - पाऊल टाकणारी
तू
कॅास करताना –
तुझे बेहाल होत असतील नाही ?

१३
तू सुंदर आहेस.
त्यापेक्षा,
तुझं लुगडं
त्यापेक्षा,
त्याची ठेवण, त्याची नेसण
सुंदर आहे !
म्हणून तर
एवढी खोलपर्यन्त रुतू शकतेस !

१४
तुझी भांगरेषाही
तुझ्या रंगाएवढीच रंगीली !

१५
भारतीय भिकाऱ्यांएवढं
चांगलं मानसशास्त्र
अख्ख्या जगात,
कोणाचेच, चांगले नसेल.
उदाहरणार्थ,
भीक मागतानाही बुरखा वापरतील.

१६
सिटी बस-
होमोसेक्सीचं आलंबनविभाव
उद्दीपन विभाव
१७
काम करण्यापूर्वी अवघड वाटते
करताना सोपं होतं
केल्यावर,
काहीच वाटत नाही !
१८
असा जीवघेणा
खानदानी नमस्कार करून कटवणं
तुला अगदीच बघ कसं जमून गेलंय
मॅग्ड्वेलच्या धुंदीत एक विचारायच
राहूनच गेलंय,
की तुझा मळा फळलाय ना ?
तुझी सफरचंदं कुठं आहेत ?
१९
अत्यंत भिन्न भिन्न वास घेऊन
ही माणसं कुठं जाताहेत ?
२०
रस्त्याने रस्त्यावरून जाताना
निरखून पाहायचं
एकेक वय असतं !
२१
धर्म,
एक सायकॉलॉजिकल ट्रीटमेंट

१४

मातीची खेळणी
बेईमान होतात मातीशी जेव्हा -
तेव्हा प्रजासत्ताक झोपत झोपत चालत असते !
अनेक बाबींवर बंदी असूनही बंदी नसते !
Some pigs are More Equal
आठवत आठवत गुजराण करतोय
आता तुम्ही पांगळ्याची गाणी म्हणायला,
काय हरकत आहे ?
रंगी बेरंगी जाती धर्मानी युक्त अशी माती
जेव्हा सेक्युलर असण्यात मग्न असते
तेव्हाच जातीयवादी पदवीधर अमाप पिकतात
कॉंग्रेसी गवतासारखे !
धर्मा धर्माचं जुळत नसलं तरी
लोका लोकातही पटत नाही
धर्म द्रोह्यांनी माती द्रोह न करता
आता निवडणुका घ्यायला काहीच हरकत नाही !

१५

माझी उणी काढून;
तुमच्या अस्तित्वाची कलई होत असेल तर -
काहीच हरकत नाही
आताशा मला घुबडांचा स्वरही मधुर वाटतोय.
काय आहे
माझ्या अस्तित्वावर मी केंव्हाच्या फात्या पढल्यायत
तुमच्या कॉमेन्टसनी तर —,
जिवंत असल्याचा भास झाला.
चला,
ही कमाईही काही थोडी थोडकी नव्हे !

१६

१
४ डिसेंबर
त्या आल्या नि गेल्या
ते आले नि गेले
ते ते ते ते ते ते ते
आले. गेले.
झालं ?
२
अंगणात मनाच्या माझ्या
एकेकीनं यावं
नि खेळून जावं
लवकर लवकर
कारण, -
मला झोपायचं असतं ना !
अरे हो,
तुम्ही, तुमची तेवढी,
ती गांडीव स्तनाग्रे
एवढ्या उघड्यावर
पेश करत जाऊ नका ना !
बाकी,-
तुमच्या शरीराला,
माझे आशीर्वाद आहेत !
३
माझं मन
पत झड का फूल·
कोमेजून,
टवटवीत होण्यासाठी धडपडणारं !

## १७ अेक नोकर : मुसलमान

माझ्या बाटग्या कानांची खैबरखिंड
भोंगळ्यांसाठी मोकळी आहे
म्हणून तर हपापलेलं तीनवीती पोट
चिकटलेलं असतं ताज्यातवान्या रोटीवर -
तर भाड्याचे घरच देत नाहीत जात विचारल्याबिगर
नाहीतरी टर्मिनेशनच्या कृष्णमेखीने
हातांचे कोपरे ढिले झालेले असतातच
घरमालकानाही नमस्कार करायला.

× × ×

चहापानाबरोबर हात जोडणारे
शकुनीमामाच्या अवलादीचे दुकानदार
उधारीचं करंटमीटर बसवून टाकतात पगारीत
बीनबोभाट कर्ण वेषात. मग–
बाकीची बाकी नंतर देतोचे मोहरमी मातम
वर्षभर खेळावे लागते हात जोडत

असंच चाललेलं असतं कसंतरी
तर माझ्यासारख्या फोर्सड शाकाहरीला
उच्चवर्णीयच सुनावतात-
त्यांच्या घरी कशाला राहिलास यार?
आमच्या जेवणाची बंडाळ होत आहे!
(अहिंसेच्या थडग्यावर सर्वोदयी रेकॉर्ड चालूय)

× × ×

माझ्याकडून मराठी शिकणाऱ्या हिंदूना
संस्कृती - संदर्भ देता येत नाहीत; तुरळकही -
(सूडाचे फालतू कुभांड गोहत्त्या रचितच असते)
प्लीज, हे कुणालाच सांगू नका -
सांगायची अनावर इच्छा झालीच तर,
मुखवटे उतरवून -
'मिडास राजाला गाढवाएवढे लांब कान होते !' सारखं-
सांगा ओरडून की,
हिंदूकरणवाद्यानों !
हिंदूकरण करण्यापूर्वी
उभयतांचे माणुसकीकरण करायला
कसलं दुखणं आलंय तुम्हांला ?

१८

लेबलांच्या आवरणाखाली असं
झाकून टाकलं भोवतालच्यानी तर
समजांची जाळीदार जंगले टाळली तरीही
टळत नसतात.
कोळ्याच्या जाळ्यात अडकल्यासारखं
कोलमडत; धडपडत एकेक दिवस ढकलणे
समज अपसमजांच्या सावलींची नक्षी काढत
चक्रावून जाणे भोवऱ्यागत !
मग निर्दोषपणाची झूल पांघरून मिरवणे
हा जुन्यात जुनी अधिक दांभिक असणाऱ्या
संस्कृतीचा एक ठेवा असतो.

# १९ एक गझलीत : तपराख

रफ :

मिस कुलकर्णी कुठंय ?
सर, ती देशमुखबरोबर चहाला गेलीय
चला- (साले कंड्या पोरी कसं गटवतात की !)
मी बॅचलर, कडू तोंड करुन ज्ञानेश्वरी शिकवतो
ज्ञानेश्वरा ! वाचव रे मला ! !

० ० ०

मालच खराब येतो त्याला आम्ही काय करणार ?
(भेसळ नाही केली तर प्रॉफीट कसे होणार ?)

० ० ०

मी समाजवादी आहे
(नाही तरी जातीकडे थोडं लक्ष द्यावंच लागतं)

० ० ०

निवडणुकांचा खर्च नसता तर -
(मी स्मगलिंग केलीच नसती.)

० ० ०

मी आपलाच शिष्य !
(मागनं बोटं करायचं सोडतो काय ?)

० ० ०

कंडा माल है यार
(मित्राची बहिण असली म्हणून काय झालं ?)

संप वगैरे करणारे करतात
(आपण आपले हात धुवून घ्यावेत)
मी चांगला हिंदू आहे.
∴ मी चांगला मुसलमान आहे.
∴ मी चांगला ख्रिश्चन आहे.
(जात कोठे विसरायची असते काय?)

○ ○ ○ ○

मुसलमान कितीही सद्गुणी असला तरी -
हिंदूंचा त्यावर विश्वास नाही
हिंदूंनी कितीही संरक्षण दिले तरी -
मुसलमानांना असुरक्षितच वाटतं.
(शांतता ! संघर्ष चालू आहे.)

○ ○ ○ ○

कशासाठी ? पोटासाठी !
मूल्यांसाठी !
तत्वांसाठी !
भक्तीसाठी !
अस्तित्वासाठी !
प्रसिद्धीसाठी !
पैशासाठी !
साठी साठी साठी साठी साठी

फेअर :

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खाजगी | मा | वि | मा | का | दु | लो | मा | चि | मा | अ | प्र |
| संस्था | स | द्या | स | र | ष्का | क | स | त्र | स | णु | ग |
| प्रोफेसर्स | ए | र्थी | कॉ | खा | ळा | प्र | भ्र | प | सां | स्फो | ती |
| विद्यापीठ | ज्यु | अ | पी | न | त | ति | ष्टा | ट | स्कृ | ट | |
| इ | के | ध्या | | दा | ते | नि | चा | पं | ति | उ | |
| बी | श | प | | र | रा | धी | र | थ | क | पा | |
| सी | न | क | | स | वा | ज | | जा | अ | स | |
| अ | | सी | | र | मा | न | | ती | धः | मा | |
| नु | | ए | | का | स | ता | | य | प | र | |
| दा | | स् | | री | म | स | | ता | त | उ | |
| न | | जे | | धो | हा | र | | पै | न | द् | |
| | | सी | | र | गा | का | | सा | | घा | |
| | | एस् | | ण | ई | री | | सौं | | ट | |
| | | | | व्या | | क | | द | | ने | |
| | | | | पा | | र्म | | र्य | | भा | |
| | | | | री | | चा | | | | ष | |
| | | | | नि | | री | | | | णे | |
| | | | | स | | | | | | आं | |
| | | | | र्ग | | | | | | दो | |
| | | | | | | | | | | ल | |
| | | | | | | | | | | ने | |

$$= \frac{\text{जनता}}{\text{लोकप्रतिनिधी}} \times \frac{\text{विधान सभा}}{\text{विधान परिषद}} \times \frac{\text{लोक सभा}}{\text{राज्य सभा}} \times \frac{\text{बुद्धीवादी}}{\text{पदाधिकारी}} \times \frac{\text{संस्कृती}}{\text{पंथ}} \times \frac{\text{अस्तित्व}}{\text{अध्यात्म}} \div \frac{\text{पैसा}}{\text{सौंदर्य}}$$

= उदार मतवादी भारतीय लोकशाही
सेक्युलर लघुत्तम साधारण विभाज्य
= उदार मतवादी भारतीय लोकशाही

(उदार मतवादी भारतीय लोकशाही हे उत्तर.)

काव्य
दा. क्र. २२९५५
२४२०
शाखा (स्थळ प्रत)

२०

आध्यापकी करायची तर हे केलंच पाहिजे
असं काही नाही. पण--
सो कॉल्ड जीव तोडून शिकवलं पाहिजे
स्ट्रेंग्थ वाढविण्यासाठी प्रचार मोहिम उघडलीच पाहिजे
परीक्षा आली की लूज गार्डिंग करावीच लागते
असं काही नाही पण-
जितकं पुरवता येईल तितकं पुरवावं लागतं
वर्षभराचा अभ्यासक्रम मुतान्यात गोळा झाला असला तरी
खामोश मुतारीत मुकाट्याने मुतावं लागतं !
मॉडेल गर्ल सारखी प्रश्नपत्रिका पावित्र्य
टिकवेलच असें काही नाही म्हणून-
परीक्षकाला गाठून परस्परांना सहकार्य द्यावं लागतं
अन् मिजमाशीसारखी पोरं पास करावी लागतात
शिक्षणाचा चुथडा झालाय असं म्हणत म्हणत
उशिरा मिळणाऱ्या पगारी उचलाव्या लागतात.
वेळ जात नाही म्हणून
अंतर्गत धुसफूस पोरांना फूस देत देत
मस्क्याचं व्याकरण चालवावं लागतं.
दिवसाचा एकेक दगड रचावा लागतो
इन्क्रीमेंट मोजत मोजत
लाच मिळत नाही म्हणून हळहळत !
शेवटी काही तरी छापून येण्यासाठी
काही तरी लिहावं लागतं !

## २१ नोंदींतून गळणारं आत्मचरित्र

प्रस्तावना :

नाव : फकीर : वय : वर्षे सत्तावीस
खेड्यात लेक्चरर वगैरे
'महा खडूस नि खवीट आहे'
'हा कटपीस आयोगासारखा महाबदमाष आहे'.
'उमदा पोरगा हाय !'
'लुच्चा आहे'.
'बैलासारखा राबतोय'
'त्यांच्या तोंडावरची माशी उडत नाही.
'तो आला तर पाणी देखील देण्याची माझी इच्छा नाही'.
'तुम्ही त्याला ओळखलंच नाही मग'
'अहो ! त्या मुसलमानाशी कशाला दोस्ती करता !'
'मराठी चांगला शिकवतो असं म्हणतात बुवा !
'कसलं बोडकीच !
'भलताच शिष्ट, रगेल माणूस आहे'.
'हिंदुसारखाच दिसतो, राहतो पण तसाच '
'होळीला आम्ही त्याला खावू घालायच तर त्यानीच पोळी खावू घातली'
'कंजूष ! दुसऱ्याचं खावं म्हणतो – आपलं मात्र'-

'अल्पसंतोषी भोळा तर हाय'.
'त्याच्याशिवाय दुसरा मुसलमान आम्हाला संस्थेत ठेवायचा नाही'.
'सगळे मुसलमान असेच रागीट. आक्रमक. हट्टी'
'जिंदादिल आदमी तो वोहीच है .
'ताटाखालचं मांजर'
'तसा खेळतो बरा. त्यांचं वाचनही आहे बरं'.
'ढोंगी अंतबार्ह्य कडू'
'त्याच्यापासून कसलाच धोका नाही'.
'इसे तो ये मालूम होता ना ओ मालूम होता'
'शानमे आयेंजी ! गाजर की पुंगी बजी जब तक बजेंगी'
'को-ऑपरेटिव्ह माईंडेड माणूस !'
'तुमचा आदर्श खरचं घेण्यासारखा आहे'.
'शांत आहे. लकी आहे!'
'घरं बदलण्यात फर्स्ट, जमतच नसेल कुणाशी.
'तुम्ही ते घर त्याला देण्यापूर्वी मला सांगितलं असतं तर बरं झालं असतं
'असं बरचसं - - - - -
या नोंदींच्या म. सा. वि. तून आत्मचारित्र गळतंय --
तेव्हा, आतमा बोंबलतोय- 'कौन अपना कौन पराया' -
स्वतःला धरून
हे वाचून तुम्हाला काही वाटलंच तर-
शेवटी तुमचीही नोंद जमेस धरावी.

२२

मनातला विद्रोह
फुसक्या शब्दातून विझत विझत चाललाय
तत्पूर्वी;
काव्यातल्या मुर्दाड विद्रोही जखमांना
मी मला समर्पित करतोय.

## २३ अेक कैफियत

तुझ्या बोलण्यात अर्थ आहे रे !
तसा त्याच्याही म्हणण्यात आहे
पण नेमकं खरं कुणाचं ?
× × ×
नागव्या डोळ्यासमोर
बोडक्या आकाशात
जो तो मुठी आवळत
डोळे विस्फारत
ओठ चावत, कधी गंभीर, कधी हसत
आपलं खरं असल्याचं पटवून देतांना दिसतोय.
× × ×
साला अर्थ शब्दाचा अर्थच जालीम !
मेंदूचे जुलाब होऊनही
नेमकं कुणाचं खरं ?
× × ×
काहो अर्थ म्हणजे घसरगुंडीच ना ?
तुमच्या माझ्या आयुष्यासारखी !
× × ×
याला काय अर्थ आहे ?
कशात काही अर्थच नाही !

यातच खरा अर्थ आहे
असं एकलं की
मला शॉक ट्रिटमेंट दिल्यासारखं होतं
परत अमळशाने काय -?
तर अर्थ शब्दाचा अर्थ चिवडणे
नेमकी पगार घेऊन आयुष्याला चिवडल्यासारखं
×     ×     ×
'चित की पट?'
'चित!'
'नाही ऽऽ'
'मग पट'
'नाही म्हटलं तर !'
'मग काय लेकाच्या ?'
'माझ्या हातात नाणंच नाही रे !'
'याला काय अर्थ आहे ?'
×     ×     ×
मग तू असं कर
भारतीय जनतेचं घुडमूळ काढ
घनमूळ वर्गमूळ काढल्यासारखं
त्याशिवाय तुला भारतीय प्रजासत्ताकाचा अर्थच कळणार नाही.

'कसं काय ?'
'ऐक-'
'विचार असा आहे
'मरताना मरण्यापूर्वी साधारणपणे
विहीर खणावी, घर बांधावं
अन् आठवतील त्यांना आठवत निवांत मरावं.
तरीही कसलाच उमट उमटू नये
अंधारात प्रकाशात, कस ?'
'याला तर काहीच अर्थ नाही'
× ×
'मग असं करू या
अर्थ या शब्दाची हुंडीच पाठवू कोशकारांना'
'तसंच काही नाही'
तुझ्या म्हणण्यात अर्थ तर आहेच रे
त्यांच्याही म्हणण्यात अर्थ असेलच
× ×
जाऊ दे तू बोअर झालायस
अर्थाला अर्थात राहू दे
आता मी लताचं जांभई पत्र वाचतो
तुलाही वाचायला काही हरकत नाही
× ×
याला काय अर्थ आहे बरं ?
कशाला तरी काय अर्थ आहे रे ?

२४

दुःखही अती झालं ना यार
तर आपलंच आपल्याला हसू येतं
आता हेच बघं ना-
‘वाऱ्यानं आलं वावटळीनं जाईल’
अशी माझ्या जिनगानीची सिनं
ऐतिहासिक नोंद केलीय
येथे मनस्तापही विकत घ्यावा लागतोय रे
जाऊंदे साला, हातचं मीठच खराब आहे
त्याला कोण तरी काय करणार
सगळेच निरर्थक आहे : अजय निराकारी
मग कविता लिहिणं काय नि नोकरी करून जगणं काय !
सगळेच हुकलेले परस्परांना दोष देत देत
बेवकूफ साले !
बरं आपलंच खरं म्हणून
आपण कुठे जाणाराहोत ?
मग मनोवस्था तशीच राहते
गाभुळलेल्या जहरी वालगुंजासारखी !

## २५ बाबा आमटे

सगळं जग व्यासांनी उष्ट केलंय हे खोटंय !

× × ×

देव, अल्ला, येशू ही बाबांसारखीच दोन अक्षरी शब्दं
बाबा देव नाही सच्चा माणूस आहे.
विश्वनिर्मिती आदितत्वातून झालीय
असं म्हटलं जातं
असेल बुवा ! पण-
बाबातत्त्वातून एक नवीन विश्व निर्माण झालंय
विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीसारखंच
हे मात्र खरंय !

× × ×

गांधी ऐकला नाही की पाहिला नाही
अभ्यासक्रमात वाचलाय
पावसाच्या थेंबात गांधींना गिरसप्पा दिसला
ते चिमण्यांच्या चिवाचिवाटावर भाळून
थांबले नाहीत तर;
त्यांच्या चाऱ्याची चिंता वाहिली
गिरसप्पापेक्षाही उंचावरून टपकणाऱ्या
त्या थेंबात मला बाबा जाणवतोय
थेंबात दडलेली निर्मिती
बाबांच्या आनंदवनात उगवलीय
ज्या चाऱ्याची चिंता गांधींनी वाहीली
तोच चारा बाबांच्या मातीतून उगवतोय

मानी जगवील त्याला मत देऊ पहाणारा बाबा
मातीशी बेईमान होणाऱ्या या दुनियेत
मला जवळचा वाटतोय
माझाच म्हणून !

× ×

मी त्यांना पाहिलंय प्रत्यक्ष पाहिलेलं नसतांना
चित्रातल्या बाबांच्या हास्यातच मला
बुद्धाच्या अर्धस्फुट ओठातलं रहस्य उमगलं
त्यांच्या आनंदवनाबद्दल ऐकलं जेव्हा
तेव्हाच मनातल्या वृन्दावनाला अर्थ आलाय.

× ×

शेतकरी बाबात सावता माळ्याचा मळा फुललाय
तर कर्मयोगी बाबात गीतेचं सार प्रकटलंय
कवी बाबा, विचारवंत बाबा
माणूस बाबा, उद्योगी बाबा
या तर एकेक पवित्रतम लीळा आहेत
चक्रधरांच्या लीळांसारख्या !
बाबांच्या विवाहाचं आख्यान ऐकून
मराठी आख्यानकाव्य कळल्याचं जाणवलं

× ×

सर्वोदय दान मागून होत नसतं तर-
बाबा निर्मित श्रमाशिल्पातून होत असतं
तपश्चर्या करुन संहारशस्त्रांचा वर न मागता
नवरचनेचा वर मिळविणाऱ्या बाबांमुळेच
रचना बांधणी-निर्मितीला अर्थ मोहर जड झालाय

बरीच भारतीय मडकी म्हणतात
बाबांना महारोग झाला होता म्हणून हें कार्य होऊ शकलं.
जणू काय यांना महारोग नाही म्हणून ते असलं कार्य करीत नाहीत
विकृतीचा कळस करणाऱ्या या कच्या मडक्यांची
बोटं झडून थापे झालेल्या बाबांच्या गोऱ्या कुंभाराकडून
थोपटून थोपटून पक्की मडकी होणाराहेत
होताहेत !
कर्मयोगी सूर्याच्या कर्मकिरणांची नौबत
घराघरात झडत आहे.
श्रमातून माणूसकीची पहाट होत आहे.
म्हणूनच जिवंत स्वावलंबन उपेक्षितांच्या रुपात वावरतंय !
बाबा बांधणीचा प्रचंड स्रोत !

× × ×

आनंदवनाचा निसर्ग अक्षरात पाहून
बालकवींची मधाळ फुलराणी मनात फुलली
या फुलराणीतच-
स्वतःचं जीर्ण उपेक्षितांच्या वाटेवर पसरुन
बसलाय अवलिया बाबा
श्रम सुगंध वाटत.
कुणीही यावं हृदय खुडून अर्पण करता करता
हातही अर्पण करावेत !

× × ×

कलंदर बाबा, शिकंदर बाबा
महात्मा, चाचा, लोकमान्य
यापेक्षाही कित्ती कित्ती जवळचा वाटतोय
मलाच मी जवळ असल्यासारखं !

२६

दुष्काळात होरपळलेल्या मातीवरील रजिस्टर्ड देवानो!
माझं चॅलेंज आहे तुम्हाला
दुष्काळाची संधी साधून बलात्कार करणाऱ्यांना
झट की पट नपुंसकत्व यावं
लाच खाणाऱ्या जनावरांना
कयामतीपर्यन्त हगवण लागावी
काळाबाजार करणाऱ्या सुव्वरांना
फटाफट लिकोमिया व्हावा.
चीजवस्तु ठेऊन घेऊन व्याज खाणाऱ्यांना
हृदयविकाराचे सतत तीनचार झटके यावेत
स्वार्थी राजकारणी भेकडांना
सपाटून वेड लागावं
'देर है अंधेर नही' म्हणणाऱ्या पाप भिरूंच्या
डोक्यात भेजा काढून शेण भरलं जावं!
बोला देवांनो! बोला, है मंजूर?
कसचं मंजूर करताय अन् काय?
असालच तर चला,
लोकांनी लोकशाहीची प्रजासत्ताक प्रेतयात्रा
काढलीय तीत सामिल होऊ या!
तेव्हा हळूच मला तुम्हाला
साधनेचा दुष्काळ विशेषांक भेट देता येईल.

## २७ रक्षियर : कंटली-अवस्था

१

तुझ्या पदरात सगळीच सुखं टाकून
आज मी माझ्या दुःखांना तुझ्यावरुन ओवाळून टाकतोय
माणसांच्या या जाम ट्रॅफिकनं रस्ताच ओलांडता आला नाही.
तू अन् मी नुसतेच हंबरत राहिलो !

२

बोलूनही बोललो नाही, भेटूनही भेटलो नाही-
हंबरण्यातच गारद होताना;
चिघळू न देता जखमांचा हिरवेपणा जपायला मात्र विसरलो नाही.

३

तुला एकच नगर हवं होतं
माझी तशी काहीच अट नव्हती
तू झुलता सोनेरी पिंजरा दाखवलास
मी फक्त जर्मनची रिकाबी वाजवली
तू फक्त - मी फक्त-ची यादी अशीच वाढत जाईल
पावसाळ्यात पूर चढल्यासारखी !

४

जिंदगीची विहीर कोरताना, बांधण्याच्या नादात
जिवंत लागलेले जिव्हाळ्याचे मन-झरे बंद ठेवले
तरीही आताशा पाझरलेल्या या सांसारिक विहिरी
बंद मन-झऱ्यांना जोपासत जपत आहेत
जपून आहेत......!

५

एकमेकात दंगताना परस्पराशी सावरायचे राहूनच गेले
स्वतःलाच सावरताना एकमेकात रमायचे राहूनच गेले

२८

शहाळी उरोजांच्या
घनगर्द जंगलातून भटकत भटकत
गाभुळलेल्या स्वप्नांचा काफिला
थिजत थिजत थिजताना
मंगलऽ
तू आलीस
समोर बसलीस पण तरीही-
अश्रूनो स्वप्नांची फुले उमलत नाहीत.
खरंच उमलणार नाहीत.
हे माहित असूनही -
तुझं शिल्पासारखं आसासून बसणं,
या फसव्या डोळ्यांत खजुराहोचं जिवंत होणं आहे !
असं असलं तरी सोनेरी भावांची किरणे
स्पर्शणार नाहीत.
तर ती
प्लेटोच्या खांद्यावर विसाव्याला जातील
जातांना उमलणाऱ्या पाकळ्यांना
डोळ्यांनी नागवं करायला विसरणार नाहीत !
अशी ही डोळ्यांची कथा
तुला तशी सांगण्याची काहीच गरज नाही.
एक सांगून ठेवतो-
थिजलेल्या स्वप्नांना गोंजारणे आता सोडून दे,
मीही सोडून दिलंय !

२९

मी बनावटी
सर्व धर्मांसारखा
मला सर्व धर्म सारखेच !
माझं राहणं; बोलणं, जगणं, हरूणं
बनावटी
सर्व जातींसारखं !
मी काय हो,
तुमच्यासारखाच !

## ३० आन्दोलन : एक प्रतिक्रिया

बावटळ सुटलीय
ज्योत ज्योत पेटवू ये
दिशांची रस्सी खेच चालूय
रक्ताची कुरघोडी करू ये
गांधीतत्त्वांचा खून झालाय
गांधी शस्त्र परजूत ये
चेंगट सरकार खिरापत वाटतीय
तडजोडीचं ढोंग रचू ये
खुन्याचं खून होत नाहीय
आंदोलनाचं खूळ मिरवू ये
भ्रष्टाचारी रक्त सळसळतंय
थोडासा भ्रष्टाचार करू ये
भ्रष्टाचार बंद करायचाय ?
मग पगारीवर दिवस काढू ये !

३१

रानातल्या हिरव्या कल्पनांना जाळून
मी केव्हाच परतलोय
तुझ्या नियमांच्या चिरेबंद सर्कशीत
तरीही तू लक्षात ठेव;
शब्दांना बिचकणाऱ्यांपैकी मी नव्हे.

×　　×　　×

दिवस मावळतीला जाताना शेजारच्या वर्गात
पत्त्यातल्या राण्यांसारख्या चिमण्यांचा
किलबिली चिवचिवाट
मला अस्वस्थ करतोय
स्टाफरूममध्ये कॅरम खेळतांना.

×　　×　　×

'कल्पना बऱ्याच सुचतात हो,
पण शब्द सुचण्यापूर्वीच त्याचं ॲबॉर्शन होतं'
असं म्हणणाऱ्या माझ्या कॅरमच्या भिडूत
मी तीच बोटं कुठंही खुपसतो
तेव्हाही अस्वस्थ होतो.

×　　×　　×

नव्याने आलेल्या
गोऱ्या गोमट्या कारकुनाचा
गालगुच्चा घेतला तरी
गप्प बसणं अनुभवलं की
का कुणास ठाऊक-माझ्यासकट
सगळेच अस्वस्थ होतात.

३२

आठवणींचं थडगं बांधून
स्वतःला घ्यावं सावरून
सलतंय ते विसरून
जगून घ्यावं

ओढून कातडी डोळ्यावर
मनाला घालावा आवर
मग करावा वावर
सर्वदूर कुठेही

आपलं तेवढंच बघावं
दुसऱ्याचं सगळंच सोडावं
मुकाट्याने तोंड द्यावं
मिळालेल्या आयुष्याला

होईल तेवढं करावं
मिळेल तेवढं द्यावं
खुशाल झुलत रहावं
जिनगानीवर

कोणी काही बोललं
तर म्हणावं बोल
आहेच सगळं फोल
म्हणूनिया.

पाहिलंय मी हिंदूंना
पीरांना भजताना
मुस्लिमांना बदडताना
दंगली दंगलीत

मोहरमात नाच नाचून
नैवद्य दाखवून
पीरांचे तबरूक घेऊन
घराला जाताना

समोर आदर दाखवावा
मागे उद्धार करावा
विरोधासाठी विरोध करावा
ज्याला त्याला

दुर्वासारखं सावध राहून
बंडखोरीचा आव आणून
स्वत:भोवती कोश रचून
बोंबलत राहावे

३३

येडझवं म्हणवून घेऊन
स्वाभिमान बाळगणाऱ्यांनी अवश्य बाळगावा
किमान शरमिंदेपणा तरी अवश्य झाकावा
लाज झाकल्यासारखं !
शिवी खाऊन चिडीचूप बसणारे
यांचे स्वातंत्र्य
त्यांचे त्यांना लाखदा लखलाभ होवो.
उपटसुंभासारख्या उंडारणाऱ्या
वाघासमोर नांगीटाकून
पिंजऱ्यातल्या मांजराला सिंह समजून
वाकुल्या दाखविण्यात रमणारी
यांची च्युतई बुद्धिमत्ता
मचक मचक करीत झेलणाऱ्यांनी झेलावी
मी कधीच झेलणार नाही !

३४

नाही तिथं
नाही तसं
जिथं तिथं फाटलेलं असताना
छंदांच्या फंदात पडणाऱ्यांनी पडावं
गावकुसाबाहेरची कविता उमलतच राहणार
श्वासोच्छ्वासाबरोबर रक्तासारखी म्हणून-
सौंदर्य पिपासू मनांनी
कुजट कुबट संस्कृतीचं
नाही तिथं
नाही तसं
जिथं तिथं जे फाटलेलं आहे
ते ते परत एकदा तपासून घ्यावं !

## ३५ दुष्काळ : ७२/७३

तरसून तरसून रानं निपाचित पडलीयेत
विवस्त्र होऊन
काळीशार धुराळलेली नग्न सडक तीतून जातेय कुठेतरी
सावरत गिट्टीला
रानाची कुठलीच माती नजरभेटीत येत नाही
जनावरांच्या पदमुद्रेवाचून
नुस्त ऊनच ऊन पसरलंय वरखाली अपरंपार डागण्या देत
सगळीच नाती आहेत कामाच्या शोधात
पोटाच्या खळगीखातर
कुठलाच पक्षी कसलेही गीत गात नाहीय
सगळीच झाडं वठलेली
निसर्गानंही सुरू केलीय भयंकर अफरातफर
भारतीयांसारखी !
परीक्षा, कॉपी, गरीबी, पदवी, वशिला, नौकरी
कशातच दम नाही
वंदेमातरम् विरोधी पुळचट भूमिकेसारखं
राष्ट्रध्वज जाळला जातो फडकं करुन
सगळीच दुष्काळलेली
माझं वठलेलं मन चिवडीत बसतं राज्यघटनेवर
स्वातंत्र्यपूर्व आशा आकांक्षांना
आपलीच आहेत सगळी की,
मीच कुणाचा नाही

३६

दुःखांना अश्रू देत देत मनाचा इतका
उकीरडा झालाय की,
हृदयविकारच हृदयावर फटकन फुटेल.
आता तुमचे सर्वच विकार मला द्या
मोबदल्यात मात्र अश्रूच द्यावे लागतील !

३७

'शिक्षक म्हणजे,
सर्वांगाने एक समर्पित जीवन'
अधून मधून आमचे पोशिंदे मायबाप म्हणत असतात
उचकी लागल्यासारखं !
गुमान कानात ठेवून परतताना रस्त्यावर जाणवते की,
शिकवण्यात मजा यायची पूर्वी
आता बोअर होतंय
स्वत:ला घेऊन कसं बसं घरी जातो तर,
'ही' म्हणते-
"मरद बेदरद
पाषाणाला पाझर फुटेल पण तुम्हाला-
जाळून जाळून राख केलीत माझी"
च्यायला, म्हणजे हे हे फालतू आहे तर
किंवा आपणच किंवा सरळ सरळ मीच
स्वत:चा मूर्खपणा वगळून
माणसाला काहीच कसे सहन होत नाही ?

३८

शुभ्र पांढऱ्या झब्ब्यावर निळसर शबनम अडकवून
पुलंची ती फुलराणी पाहण्यास उत्सुक असताना
हिरवट किनारीचं पांढरं पातळ नेसून तू आलीस
अन् डिवचण्यासाठी तू मला म्हणालीस
'या धोपटीत काय आहे ?
मी म्हटलं-'चाफा आहे'
फुलून येणारा चेहरा सावरत म्हणालीस-
'अजुन काय आहे ?'
मी म्हटलं - 'स्वस्तिकच्ची चित्रें असलेली लुंगी आहे'
आता मात्र तू खऱ्याखोट्याच्या पलिकडचं हसलीस
थोडं थांबून तुला गरज नसताना चाफ्याची मागणी केलीस
मीही चित्र्यंची 'चाफा : देवाची आई' तुझ्या हाती दिली
या वेळी मात्र मी तुझं हसू कसं होतं हे पाहिलं नव्हतं
तू विचारावं म्हणून की काय सहज विचारलं
'अजुन ?'
मला राहवलं नाही म्हणून मी सांगून टाकलं
'यात तुला न झेपणारं माझं मन आहे'
माफ कर,
शेवटून तुझ्या नुसत्याच हसत राहण्याला मी सोबत देऊ शकलो नाही

३९

जन्मलो नवसासायासांनी
म्हणून काय नाव फकीर ठेवायचं ?
× ×
मी कधी कधी उत्तररात्री
पान खात खात
संभोगानंतरही कविता लिहितो
त्याना संभोगानंतरच्या कविता म्हणायचं ?
× ×
मी रांडेचे पोर
तुम्ही माझ्याशी सोयरीक कराल ?
× ×
मी भाग्यवान आहे
कारण मला नको तिथं तिळ आहे
आता प्रत्येक ज्योतीषी फसतोच
त्याला मी काय करणार ?

५०

हवी असते
सुंदर छोकरी
किंवा बायको
किंवा वेश्याही
स्वप्नात कां होईना दोन थेंब गळेस्तोवर
×   ×
हवी असते
संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, इबादत
स्वप्नात का होईना स्वप्न संपेस्तोवर
×   ×
माझं तुझं
त्याचं तिचं
असंच असतं स्वप्नातलं स्वप्न देहनाशेस्तोवर.

४१

जे जे जसं भोगलं
तसं ते ते
शब्दांतून अंथरलंय,
तुमच्या डोळयांखाली
ओढ्याची धार
खडकावर
उमटावी तसं
चालतांना,
पाहतांना,
वाचतांना
जे जे टोचेल
भिडेल
त्यालाच
हृदयाशी घ्या.
एरव्ही तुम्ही
चालतच आहात !



॥ तिच्या कविता ॥
॥ तिच्या कविता ॥
॥ तिच्या कविता ॥

५२

आषाढ घनापरी तू अशी बरसत राहावी
बहरल्या देहाची चिंब हिरवी फुलं गळावी

गंधल्या श्वासांनी तू फुलावे नि फुलवावे
जसे वाऱ्याने रेशमी पदर उमलून यावे

हुरमळले मन माझे, डोळ्यात तरळली आसवे
तरंगतोय असा की वासराच्या कानी वारा शिरावे

असा मी खुशीने गुंगुनी निवांतसे बेमान व्हावे
अन् मला तू अलगद, कडीकपारी ढकलून यावे

तिरकस बोलांनी माझ्या, देह तुझा गदगदून जावा
अबोल होऊनी मी, तुझ्या अश्रूचा निरोप घ्यावा

तसे काहीही झाले तरी तू मला विसरूच नये
संन्यस्त आयुष्याच्या काठी दुःखात गाणे झोंबावे

घडू नये ते घडले तर तू देवीला नवस करावे
फेडता तुझ्या मनावर मी वेदनेचे डोंगर हळूच ठेवावे

४६

त्रिगगी गहन्यावर उत्तररात्री का म्हणून बाभळींनी आसवे ढाळावी
झुरवुनी तुझी काया पिवळी आसवे ती का म्हणून तू गोळा करावी !

विमल तुझ्या अधरांच्या देठोदेठी, त्या मिठीसारखी शब्दफुले फुलावी
अन् खुडावी मी हळूच ती, जशी नृत्यमग्न मयुरांची पिसे गळावी

उर भरुनी तुझ्यासाठीच घनव्याकुळ होतोय मी इथे
सूर मारूनी गाठ किनारा साहणार तू किती बसून तिथे

हृदयी रुतणाऱ्या डोळ्यांनी किती करशील माझ्यावर अश्रूंचे ऋण
अज्ञाने तू तडफडून मरशील अन घोकत झुरत मी मरेन

४४

घुंडुंबल्या हृदयी तुझ्या आठवणीं
जसे अम्बर भर भरूनी यावे

हसत राहणार नसशील तर
फाटणारे काळिज कसे सांधावे ?

हलक्या पावली ये भरंकन
जसे स्वाध्वीने देऊळी प्रवेशावे

सांजवताना तुझ्या गावच्या दिशेने
मी फक्त शब्दांना धुंडाळावे !

४५

‘संध्याकाळच्या कविता’ सारखी सांज
अप्सरांचाही सहवास तुच्छ वाटायला लावणारा तुझा सहवास
निशीगंधासारखं व्यापून टाकणारं तुझं लावण्य काहूर
तेव्हा तू पापणीत अडकलेल्या आनंदाश्रूतून न्याहळत होतीस
अन् मी अस्मान होऊन अशरीरी चालत होतो
तर हस्तरेषांसारखी मंत्रगत शब्दउधळण करत करत
सोलीव बंधनातीत अध्यात्मिक मनाचं
तू मला दान केलंस
हरिश्चंद्रानं स्वप्नात राज्यदान केल्यासारखं !
मग मीही जिवंत समाधिस्थाच्या साक्षीत
एक आयुष्य तुझ्या पदरात ठेवून दिलं
आता ताजमहाल शहाजहाँचं असो की
अग्रेश्वरीचं तेजोमहालय असो-
ते सगळचं खुळेपणाचं झालंय !
मनोमिलनाच्या स्मरणशिल्यातून कोरलेली आपली अमूर्त भावलेणी
परस्परांच्या अस्तित्वावर गोंदलेली असताना
स्वर्ग नि अमरपण पायी तुडवली गेली तरी
त्याची आपणाला बिलकुल खंत नाही !

४६

औरंगाबाद
बेगमपुरा
उंचावरचं घर
चंद्र
चाफा
मी
तुझ्या आठवणी
फुलांचा सडा
बीबीका मकबरा पहात पहात तू म्हणालीस
'मला तुझं एक आयुष्य दे'
'मिळणारी सगळी आयुष्यं तुझीच आहेत'
'मी मेल्यावर तू दोन अश्रू ढाळशील का रे?'
'नक्कीच'
परत तू म्हणालीस -
आपण कुठून आलोत?
'स्वर्गातून'
तेव्हा - परस्परांची गच्चच्च गच्च अनसेक्सी मिठी
आता उरलेली सगळी शब्दं अर्थहीन झालेली आहेत.

४७

अंगदी असं ठरवलंय की
तुझी आठवणच करायची नाही
तुझ्याकडे यावसं वाटू नये म्हणून
मी माझी चंपी करून घेतलीय
तुला दिलेली शब्द पाळायची नाहीत
असंही ठरवण्याच्या मार्गावर आहे-
तू म्हणाली होतीस ना - की,
'अरे! तू असं करुन मला गोत्यात आणतोस की काय?'
ते खरं ठरण्याची शक्यता निर्माण झालीय
ही तुला थट्टा वाटेल, पण तसं काही नाही
मी कधी तरी तुझ्यावर फिदा होतो म्हणून
एवढंच म्हणेन की - 'सावध राहा'
माझं काय? मी पुरूष आहे!
मी अशी अशी मज्जा केली म्हणून सांगितलं तर
सगळीच समाजरचना हसेल
ते तुला, मला नाही!
उलट माझीच वाहवा करतील!
भोग भोगावे लागतील ते तुला
एका भारतीय स्त्रिलाच विव्हळणे
कुढणे, गुदमरणे, झिजणे
प्रकृतीनेच बहाल केलंय काय?
नाही! नाही!! व्यवस्थेने केलंय.
म्हणजे मीच
तरीही तू माझ्यावर प्रेम करतेस
म्हणजे कमालच आहे तुझी!

डोळ्यांना अंधारी येईस्तोवर
परवापर्यन्त नजरेनेच भोगलेले कातडीचे हिरवेपण
उजाड आयुष्यात मनाबरहुकुम कधीच फुलले नव्हते
पण काय झाले कुणास ठाऊक
काल अचानकच
चंद्र उगवला
कोकिळेला कंठ फुटला
कमळं फुलली
भ्रमरंही गुणगुणली
नि आज अचानक तू म्हणालीस-
अरे ! ते सर्व नाटक होत
तुझ्या जळलेल्या मनाला फुलवण्यासाठी केललं
फुलवून खुडण्याच्या तुमच्या सनातन सवयीला
हे मनही बळी पडले.
आता परत
चंद्र मावळलाय
कोकिळा उडून गेलीय
कमळे मुडून गेलीत
भ्रमरेही हरवलीत
शेवटी -तुझ्या पदरी एकच बांधून ठेव
फुलताना किंवा फुलवताना-
नाटकं कधीच करू नकोस
का की,
परमेश्वरमोलाच्या एका मनाचा प्रश्न असतो !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
दा. क्र. २२९५५
२४२०
REFBK-0022955
REFBK-0022955



मढेंकर रेगे ह्यांच्याजवळ स्थिर झालेली मराठी कविता दिलीप चित्रे ढसाळ ह्या पिढीनं पुढे नेली. नवी कविता वेगवेगळ्या अंगांनी बहरली समृद्ध झाली. काल परवा चेष्टेची झालेली नवी कविता आज शब्दांचा घाट, लयबद्ध मोड, अनुभव मांडण्याची पद्धती, निसर्गाचीच नव्हे तर सामाजिक, राजकीय संदर्भातील दंभस्फोट इत्यादी सर्वच संबंधात परिपक्व रुपानं सामोरी आहे.



गेल्या दशकाच्या जवळपास किती तरी नव्या कवींनी स्वतःच्या अशा नव्या वाटा निर्माण केल्या, करताहेंत. नव्याने लिहिणाऱ्यांमध्ये फ. म. शहाजिंदे ह्यांची कविता लक्षात राहाते. नव्या अपेक्षा निर्माण करते. प्रादेशिक, ग्रामीण शहरी हिंदू-मुस्लिम, सामाजिक सटायर इ. मुद्दाम हेतुतः भेदाभेद मला कवितेत मान्य नाहीत, ओघानं अलाहिदा ते येतात, कधी अपरिहार्य पणानं येतात. शहाजिंदे ह्यांचो कविता अशा निर्मळतेनं वाचावी. नव्यानं लिहित असले तरी शब्दांचे अनुभव मांडण्याचे सराईतपण विशेषत्वानं जाणवते. काही सामाजिक संदर्भाचे, माणसांचे, क्षणांचे टिपलेले चित्र अस्वस्थ करुन सोडते. उदा. इंप्रेशनस हैद्राबादचरा, बाबा आमटे इ. कित्येक कवितामधील मुस्लिम पेहराव असलेल्या भावनांचा भाग मनाला अबलख दुनियेत नेतो. त्यातही नवेपण शहाजिंदे ह्यांचे आहे.

माझ्या छातीवर--
जगन्नाथ रथोत्सवाची नि हाजची गर्दी दाटलीय
मी किंचित जेरुसलेम

शहाजिंदे ह्यांची कविता अनुभवाच्या सामर्थ्याने नवीन कक्षा धुंडाळीत जाईल. शब्दांना नवे मोड देईल. या संग्रहात त्याची चाहूल लागली आहे. नव्या समृद्धीची रसिक वाट पाहाताहेत.

ना. धों. महानोर — १० ऑगस्ट १९७९

॥ महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाच्या अनुदान साहाय्याने